श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-६, अंक-२३ | फेब्रुवारी-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | विशेषांक ३, पाने ८

## ‘खेलो इंडिया’ स्पर्धेत ‘एसव्हीजेसीटी’च्या ईशा पवारचा ‘सुवर्णवेध’!

### *‘बेस्ट प्लेयर अवॉर्ड’ मिळाल्याबद्दल ‘आर्चरी असोसिएशन ऑफ इंडिया’चे अध्यक्ष श्री. विजयकुमार मल्होत्रा यांच्याकडून खास अभिनंदन !*

दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये झालेल्या पहिल्या ‘खेलो इंडिया स्कूल गेम्स’च्या ‘कांपाउंड इंडिव्हिज्युअल इव्हेंट - आर्चरी (मुली)’ या गटात डेरवणच्या ‘श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट’ची इंग्लिश मिडियम शाळा आणि ‘एसव्हीजेसीटी स्पोर्ट्स’ची खेळाडू ईशा पवार हिने सुवर्णपदक मिळविले असून ‘बेस्ट प्लेयर अवॉर्ड’सुद्धा तिलाच जाहीर झाल्यामुळे आनंद द्विगुणीत झाला आहे.

देशात दर्जेदार खेळाडू तयार व्हावेत व २०२४च्या ऑलिम्पिकमध्ये भारताचा नाव कोरले जावे या उद्देशाने घेण्यात आलेल्या ‘खेलो इंडिया’ च्या राष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत ईशाने सुवर्णपदक पटकावले असून कोकण आणि महाराष्ट्राची सुवर्णकन्या होण्याचा मान मिळवला आहे. भारतातील सर्वोत्कृष्ट गुणवान खेळाडू म्हणून ‘आर्चरी असोसिएशन ऑफ इंडिया’चे प्रेसिडेंट श्री. विजयकुमार मल्होत्रा यांचेकडून तिचा गौरव करण्यात आला आहे. तिला भारत सरकारतर्फे वार्षिक ५ लाख रुपयांची शिष्यवृत्ती आठ वर्षे मिळणार आहे.

दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये झालेल्या या स्पर्धेत देशातील १६ राज्यातील १६० खेळाडूंमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी




*ईशा पवार सुवर्णपदकासह*




ईशा पवार डेरवण क्रीडासंकुलात कसून मेहनत करताना

करीत ईशाने हे यश मिळवले आहे. सर्व खेळाडूंमधून बाद फेरीसाठी ३२ खेळाडू निवडण्यात आले होते. त्यामध्ये ईशाला पाचवे रँकिंग मिळाले होते आणि ती सुवर्णपदकाची प्रबळ दावेदार असल्याचे दिसून आले होते. उपांत्य फेरीत तिने झारखंडच्या सविताकुमारीवर १० गुणांनी मात केली तर अंतिम फेरीत झारखंडच्याच बबिताकुमारीवर तब्बल १८ गुणांनी विजय मिळवला आणि सुवर्णपदक मिळवले.

ईशाने मिनी नॅशनल (१४ वर्षांखालील मुली) स्पर्धेत २०१५, २०१६, आणि २०१७ असे सलग तीन वर्षे सुवर्णपदक मिळवले आहे. राष्ट्रीय स्तरावर १६ सुवर्ण, ५ रौप्य आणि ४ कांस्य अशी एकूण पंचवीस पदके तिने मिळवली आहेत. राज्य स्तरावर ३१ सुवर्ण, १७ रौप्य आणि १६ कांस्य अशी तिची केवळ गेल्या तीन वर्षातील पदक-कमाई आहे. ईशा २०१४ पासून 'एसव्हीजेसीटी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स'मध्ये राष्ट्रीय प्रशिक्षक रणजीत चामले आणि ओंकार घाटगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे.

आज मिळालेल्या यशानंतर भ्रमणध्वनीवरून बोलताना, ''शासनकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचे सोने करून येणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत देशासाठी सुवर्णपदक मिळवून 'खेलो इंडिया'चा उद्देश सार्थ ठरवेन'' असा आत्मविश्वास ईशा पवार हिने व्यक्त केला.

डेरवणसारख्या लहानशा खेडेगावात एवढे मोठे, अद्ययावत क्रीडासंकुल उभारून आणि त्या संकुलात महाराष्ट्रभरच्या खेळाडूंना सरावासाठी सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यामागे प.पू. श्रीकाकामहाराज जोशी यांनी जी दूरदृष्टी दाखविली आणि समोर ऑलिंपिक पदकाचे मोठे उद्दिष्ट ठेवले आणि त्याचा नियोजनपूर्वक पाठपुरावा केला त्याला आता मधुर फळे येण्यास सुरुवात झाली आहे अशीच प्रतिक्रिया सर्वत्र व्यक्त होत आहे. 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'चे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनीही ईशा पवार हिच्या देदीप्यमान यशाबद्दल संतोष व्यक्त केला आहे. ईशाच्या यशाचे वृत्त येताच क्रीडासंकुलात आणि ईशाच्या शाळेत तर मोठ्या प्रमाणावर जल्लोष व्यक्त करण्यात आला. पुढील वाटचालीसाठी ईशाला लाख लाख शुभेच्छा!



प्रजासत्ताकदिनाच्या कार्यक्रमात लहानग्या विद्यार्थिनीचा सभाधीटपणा

# डेरवण इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी निवृत्त आय.ए.एस्. ऑफिसर व महाराष्ट्र राज्याच्या माजी निवडणूक आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडासंकुलाच्या क्रीडांगणावर तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. त्यानंतर राष्ट्रगीत व ध्वजगीताचे गायन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध कवायतींचे विविध प्रकार हे कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य ठरले. यानंतर शाळेतील नर्सरीपासून ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपल्या देशातील विविध सामाजिक समस्यांना अनुसरून पाणी वाचवा, स्वच्छता, आरोग्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, शांतता आणि एकात्मता, इ. विषयांवर इंग्रजी, संस्कृत, स्पॅनिश व जर्मन या भाषांमधून आपले विचार व्यक्त केले.



*श्रीमती नीला सत्यनारायण अध्यक्षीय भाषण करताना*

राष्ट्रीय स्तरावर आणि राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या धनुर्विद्या, नेमबाजी, जलतरण, मल्लखांब, ॲथलेटिक्स या खेळातील खेळाडूंचा संस्थेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. नंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तिपर गीतांवर नृत्ये सादर केली. योगासाने आणि मल्लखांब प्रात्यक्षिके चित्तवेधक होती.

उत्कृष्ट कवायतीबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून आपल्या अध्यक्षीय भाषणात श्रीमती नीला सत्यनारायण म्हणाल्या, ''काल मी इथे आल्यापासून बघते आहे की तुमची शाळा, हॉस्पिटल आणि इथले वातावरण, मुंबईच्या काही उत्तम हॉस्पिटल आणि शाळांपेक्षाही चांगले आहे. इथे तुम्हाला फक्त शिक्षण दिले जात नाही, तर इथे माणसे घडविली जातात; चारित्र्य घडविले जाते.



*श्रीमती नीला सत्यनारायण यांच्या हस्ते ध्वजवंदन*
*सोबत श्री. विकासराव वालावलकर, श्री काकामहाराज जोशी, डॉ. सुवर्णा पाटील, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर आणि विद्यार्थी*

मला वाटते हा तुमच्या संस्थेचा Strong Point आहे आणि तो सर्वात महत्त्वाचा आहे कारण तुम्ही खूप मोठे व्हाल, विविध क्षेत्रात यश मिळवाल, पण जर तुम्ही उत्तम संस्कारी व चारित्र्यवान माणूस नसाल तर आपल्या देशाला त्याचा काहीच उपयोग नाही. जेव्हा देशातली माणसे चारित्र्यवान असतात तेव्हाच देश प्रगती करतो.'' प्रसिद्ध उद्योगपती श्री. रतन टाटा यांच्या सभ्य आणि विनम्र वागण्याविषयीचे अनेक प्रसंग त्यांनी सांगितले. एकदा विमानाचे तिकीट काढायला गेले असता स्वत: लाईनमध्ये उभे राहून त्यांनी तिकीट खरेदी केले. ते आपल्या गाडीत काही वेळा सर्वसामान्य, अनोळखी अशा पादचाऱ्यांना 'लिफ्ट' देत असत. एकदा हवाई प्रवासात अंगावर एअर होस्टेसकडून चुकून ज्यूस सांडले. त्यांनी तक्रार किंवा आरडाओरडा न करता; 'पुढच्या वेळी 'व्हिस्की' सांड!' असे नर्मविनोदाने बोलून त्या घाबरलेल्या एअरहोस्टेसला दिलासा दिला. टाटांच्या लहानपणची एक गोष्ट त्यांनी सांगितली.

श्री. टाटांनी लहानपणी एकदा आपल्या आयाबाईला रागाने लाथ मारली तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना भरपूर चोप दिला आणि त्यांनी सांगितलं की तू 'कोण' आहेस हे महत्त्वाचे नाही, तर तू 'कसा' आहेस हे महत्त्वाचे आहे. हा उपदेश टाटांनी आयुष्यभर लक्षात ठेवला.

आपल्या भाषणात त्या पुढे म्हणाल्या, ''तुम्ही कितीही मोठे व्हा, यशस्वी व्हा, श्रीमंत व्हा, परंतु तुम्ही 'कोण' आहात या पेक्षा 'कसे' आहात हे महत्त्वाचे आहे. आपण चारित्र्यवान होणे महत्त्वाचे आहे. दुसरी गोष्ट सांगायची म्हणजे आज आपण या झेंड्याविषयी बोललो, झेंड्याचा अभिमान बाळगला, पण आपण खरोखरच देशाची सेवा करणाऱ्या लोकांचा मानसन्मान ठेवतो का?'' असे विचारून त्यांनी एक गोष्ट सांगितली.

''एकदा ट्रेनमध्ये प्रवास करताना एक सॉफ्टवेअर इंजिनीअर आपल्या लॅपटॉपवर काम करीत होता. स्वत:शीच नाराजीने कामाच्या अतिताणाबद्दल बोलत होता. शेजारी बसलेला सैनिक त्याच्याशी बोलू लागला, 'आपण सॉफ्टवेअर इंजिनीअर दिसता. आपण या लहानशा लॅपटॉपमधून किमया घडवता. देशाला महासत्ता बनविण्यात आपले योगदान मोठे आहे. भारतीय इंजिनीअर्सचे नासामध्येसुद्धा मोठे योगदान आहे. आपण खूप मौलिक काम करता. आपणाला खूप काम करावे लागते. त्यावर तो इंजिनीअर थोडा खूष होऊन म्हणाला, ''पण आमच्या व्यवसायात खूप स्पर्धा आहे. सतत स्पर्धेला तोंड देऊन स्वत:ला सिद्ध करावे लागते, नाहीतर अन्य स्पर्धक पुढे जातील! आम्ही सतत 'फायरलाईन'मध्ये काम करीत असतो. नाहीतर आम्हाला 'फायर' करतील. बाकी तुला 'फायरलाईन' म्हणजे काय हे कसे कळणार म्हणा!'' त्यावर सैनिक म्हणतो, ''साहेब, तुम्ही आता 'फायरलाईन'बद्दल बोललात, मला थोडी माहिती आहे त्याबद्दल. मी आर्मीमधला सुभेदार आहे आणि कारगीलच्या युद्धात मी होतो. त्या युद्धात एक शिखर काबीज करायचे होते आणि आम्ही ३० जणांची तुकडी घेऊन ते शिखर काबीज करण्यासाठी निघालो. सगळ्या बाजूंनी बर्फाचा मारा, वरून शत्रूच्या गोळ्यांचा मारा, अशा अवस्थेत आम्ही रात्रीच्या अंधारात हळूहळू वर चढत होतो. काय सांगू तुम्हाला, आम्ही शिखरावर पोहोचेपर्यंत आमच्या ३० पैकी चारच जण शिल्लक होतो. बाकी सगळे मारले गेले. तेवढ्यात आम्हाला आमच्यातलाच एकजण घायाळ होऊन पडलेला दिसला. मी धावतच त्याला उचलून आणण्यासाठी निघालो. तेवढ्यात आमचे कॅप्टन बात्रा धावत पुढे आले आणि मला बाजूला सारत म्हणाले की, मी कॅप्टन आहे, मी जबाबदारी घेतो. मी त्यांना म्हटले की, साहेब तुम्ही आमच्यापेक्षा सिनिअर आहात, मला जाऊ द्या त्याला आणायला. कॅप्टन म्हणाले, ''नाही, मी तुमच्या तुकडीचा प्रमुख म्हणून ही माझी जबाबदारी आहे.'' कॅप्टन तिकडे धावले, त्यांनी जखमी जवानाला उचलून आणले. पण त्याला आणीपर्यंत त्यांच्या देहाची चाळण झाली होती; आणि ते धारातीर्थी पडले. साहेब, तुम्हीच सांगा,'फायरलाईन' म्हणजे काय हे मला कळतं की नाही हो?'' त्या इंजिनीअरने उठून त्या सैनिकाला सलाम केला!

भाषणाचा समारोप करताना त्या म्हणाल्या, ''मुलांनो, आपण काय करतो, कोणत्या क्षेत्रात काम करतो हे महत्त्वाचे नसून आपली बांधिलकी जास्त महत्त्वाची आहे. कालपासून मी या परिसरामध्ये जे बघते आहे, अगदी लहान माणसापासून ते श्रीकाकामहाराजांपर्यंत आणि मुंबईहून येऊन धावपळ करणाऱ्या वालावलकर दाम्पत्याकडे, तर मला असं वाटतंय की एकच सूत्र सगळ्यांना बांधत आहे आणि ते म्हणजे बांधिलकी. तुम्ही आयुष्यात न आवडणारे काम गळ्यात धोंडा बांधून पुढे रेटत बसण्यापेक्षा त्या सुभेदारासारखे, जे कराल त्यावर प्राणापेक्षा जास्त प्रेम करा. आपल्या झेंड्याची शान फक्त आर्मीमध्ये जाऊन येत नाही तर आपण साधे सिव्हिलिअन्सही आपापल्या परीने देशासाठी योगदान देऊ शकतो. पुन्हा एकदा मनापासून तुमचे अभिनंदन करते आणि पुन्हा एकदा सांगते की तुम्ही खरंच खूप भाग्यवान आहात! अशा प्रकारची शाळा, शिक्षक, व्यवस्थापन तुम्हाला मिळालंय की तुमचा मला हेवा वाटतो. धन्यवाद!''

या कार्यक्रमाला संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री काकामहाराज, कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, संस्थेतील इतर मान्यवर, डॉक्टर्स, सर्व विभागातील कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या झांज नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली.



विद्यार्थ्यांचा जोषपूर्ण भांगडा

# ‘बेसिक सर्जिकल स्किल कोर्स’

दि. ९ फेब्रुवारी २०१८ ते दि. १७ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स, एडिनबर्ग, इंग्लंड द्वारे ‘बेसिक सर्जिकल स्किल कोर्स’ ची कार्यशाळा वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल व रिसर्च सेंटर येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर ट्रेनिंग प्रोग्रॅममध्ये रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्सचे डॉ. इयान वॅलेस व डॉ. पॉल फिशर हे सर्जन्स प्रशिक्षण देण्यासाठी सहभागी होणार आहेत. त्यांच्याबरोबर डॉ. नंदन कानविंदे MS (Ortho.), FRCS, डॉ. सुनील नाडकर्णी MS (Ortho.), FRCS व डॉ. शर्मिला कानविंदे सहभागी होणार आहेत. अशा प्रकारची प्रशिक्षण कार्यशाळा ग्रामीण भागात भारतात प्रथमच आयोजित करण्यात आलेली आहे. या कार्यशाळेसाठी भारतातील विविध राज्यातील ४० डॉक्टर्स सहभागी होणार आहेत. या कार्यशाळेमध्ये शस्त्रक्रियेमधील विविध कौशल्ये व तंत्रे यांची प्रात्यक्षिके दाखविण्यात येऊन, रुग्णांवर उपचार करण्यासाठी ती अतिशय उपयुक्त ठरणार आहेत. या कार्यशाळेसाठी वालावलकर रुग्णालयात ‘रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स’ येथील ‘लॅब’ प्रमाणेच आंतरराष्ट्रीय दर्जाची ‘स्किल लॅब’ उभारण्यात आलेली आहे. अशा स्किल लॅबमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे विविध ट्रेनिंग प्रोग्रॅम्स परदेशी विद्यापीठांच्या सहकार्याने भविष्यात आयोजित करण्यात येणार आहेत. अशा प्रकारचे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असलेली प्रयोगशाळा आणि ट्रेनिंग प्रोग्रॅमद्वारे सध्याच्या प्रचलित वैद्यकीय शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल होणार आहे.



*डॉ. पॉल फिशर, डॉ. इएन वॅलेस, डॉ. नंदन कानविंदे आणि डॉ. सुनील नाडकर्णी ‘बेसिक सर्जिकल स्किल कोर्स’च्या डेलिगेट्सना संबोधित करताना*



*डॉ. इएन वॅलेस ‘लॅब’ मध्ये डेलिगेट्सना लेक्चर देताना*



*डॉ. पॉल फिशर, डॉ. नंदन कानविंदे आणि डॉ. इएन वॅलेस चर्चा करताना*

वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल व डायग्नोस्टिक रिसर्च सेंटरमध्ये अशी विविध प्रकारची शस्त्रक्रिया शिबिरे, कोलॅबरेटिव्ह संशोधन कार्यशाळा व बेसिक सर्जिकल स्किल ट्रेनिंग कोर्सचे आयोजन डॉ. सुवर्णा पाटील (मेडिकल डायरेक्टर) यांनी श्री. विकासराव वालावलकर (कार्यकारी विश्वस्त, श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट) यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. वरील सर्व प्रकारच्या कार्यक्रमाच्या आयोजनाची दूरदृष्टी व नियोजन श्री. अशोक रघुनाथ जोशी तथा श्रीकाका महाराज (प्रमुख विश्वस्त, श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट ) ह्यांचे असून त्यांच्या आशीर्वादाने हे सर्व उपक्रम यशस्वी होत आहेत.

# डेरवण येथे आंतरराष्ट्रीय वैद्यकीय संशोधन परिषद




*आंतरराष्ट्रीय वैद्यकीय संशोधन परिषदेसाठी आलेल्या संशोधक प्रतिनिधींचे स्वागत करताना मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील*

दि. ४ फेब्रुवारी २०१८ ते दि. ९ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज येथे 'कोलॅबोरेटिव्ह नेटवर्क फॉर अडोल्सन्ट न्युट्रिशन ॲण्ड हेल्थ इन सब-सहारन आफ्रिका ॲण्ड इंडिया' या विषयावरती आंतरराष्ट्रीय वैद्यकीय संशोधन परिषद आयोजित करण्यात आली आहे. सदर परिषदेमध्ये जगातील विविध १० संशोधन केंद्रातून संशोधक सहभागी होत आहेत. संशोधक इंग्लंड, साऊथ आफ्रिका, केनिया, इथिओपिया, जागतिक आरोग्य परिषद, जिन्हेवा, स्वित्झर्लंड व भारत अशा विविध ठिकाणांहून परिषदेत सहभागी होत आहेत. सदर संशोधन परिषदेमध्ये किशोरवयीन मुलींचे आरोग्य, आहार व मानसिकता याविषयी संशोधन करण्यात येणार आहे. किशोरवयीन मुलगी ही भावी माता असते. किशोरवयीन अवस्थेत जर तिचा आहार चांगला नसेल, तर भावी काळात तिला मधुमेह, रक्तदाब व हृदयरोग इत्यादी आजार होण्याची संभावना जास्त असते. त्यामुळे सदर संशोधन परिषदेमध्ये सर्व सहभागी तज्ज्ञांकडून चर्चा-विनिमय करून, संशोधनाची रूपरेषा ठरविण्यात येणार आहे. त्यामुळे भावी काळात ह्या आजारावर उपचार करणे सोपे जाणार आहे. अशा प्रकारचे संशोधन १० जागतिक केंद्रात सुरू होणार आहे. त्यापैकी एक केंद्र म्हणून वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजची निवड करण्यात आलेली आहे. हा संपूर्ण प्रोजेक्ट मेडिकल रिसर्च कौन्सिल, इंग्लंडद्वारे राबविण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या जागतिक दर्जाच्या संशोधनात वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजची निवड म्हणजे भारताच्या व कोंकणच्या इतिहासात मानाचा तुरा आहे. अशा प्रकारच्या संशोधनामुळे 'नॉन कम्युनिकेबल डिसीज' म्हणजे मधुमेह, कर्करोग, रक्तदाब व हृदयरोग इत्यादी आजारांच्या उपचार पद्धतीमध्ये व त्याला प्रतिबंध करण्याच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल घडून येणार आहेत. त्यामुळे ह्या संशोधन परिषदेच्या कार्यशाळेला अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे.



*संशोधक प्रतिनिधींचे विचारमंथन*



*संशोधक प्रतिनिधींची शिवसृष्टीला भेट*

# वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, डेरवण येथे आंतरराष्ट्रीय वैद्यकीय महोत्सव

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, डेरवण, ता. चिपळूण येथे दि. २७ जानेवारी २०१८ पासून विविध आंतरराष्ट्रीय वैद्यकीय सेवांचे महाशिबिर आयोजित करण्यात आले होते.

ब्रिटनमधील न्यू कॅसल येथून २५ डॉक्टर्स, सिस्टर्स व टेक्निशियन्स ह्यांच्या टीमने दि. २७ जानेवारी २०१८ ते २ फेब्रुवारी २०१८ या काळात वालावलकर रुग्णालयात येऊन कोकणातील रुग्णांवर विविध शस्त्रक्रिया व उपचार केले. वालावलकर रुग्णालयात दरवर्षी ही ब्रिटिश डॉक्टर्स व सिस्टर्सची टीम येऊन गरजू रुग्णांवरती विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व उपचार करत असते. या शिबिरात ब्रिटिश टीमकडून २२६ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यापैकी ३७ जनरल सर्जरी, २४ जॉईंट रिप्लेसमेंट, २९ मुतखडे शस्त्रक्रिया, १५ प्लॅस्टिक सर्जरी, ११ मणक्यावरील शस्त्रक्रिया व ११० मोतीबिंदू शस्त्रक्रिया अत्यल्प दरात करण्यात आल्या. ब्रिटिश डॉक्टर्स, सिस्टर्सकडून वालावलकर रुग्णालयातील डॉक्टर्स, सिस्टर्स व टेक्निशियन्ससाठी विविध वैद्यकीय विषयांवर लेक्चर्स, ट्रेनिंग प्रोग्रॅम घेण्यात आले. ही ब्रिटिश टीम गेली १३ वर्षे सातत्याने वालावलकर रुग्णालयात येऊन वैद्यकीय सेवा पुरवत आहे. ह्या शस्त्रक्रिया सप्ताहाचा लाभ कोकण विभागातील गरजू रुग्णांनी घेतला. कोकण विभागातील डॉक्टर्ससाठी ब्रिटिश डॉक्टर्सनी वैद्यकीय विषयांवर व्याख्याने आयोजित केली होती. त्याचा लाभ ८० डॉक्टर्सनी घेतला. ब्रिटिश डॉक्टर्स व सिस्टर्सनी डेरवण परिसरातील विविध खेडेगांवात जाऊन तेथील रुग्ण तसेच गरोदर स्त्रिया, लहान मुले, किशोरवयीन मुली यांच्या वैद्यकीय तपासण्या केल्या आणि त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी वालावलकर रुग्णालयाद्वारे संचालित विविध बचत गटामधील स्त्रियांना भेट देऊन मार्गदर्शन केले.




*ब्रिटिश वैद्यकीय पथकाचे स्वागत करताना मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील*

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१

ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com




*ब्रिटिश वैद्यकीय पथकातील डॉक्टर्सनी खेडोपाडी जाऊन मुलांची आणि मातांची आरोग्य तपासणी केली*



*वालावलकर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना डॉ. पीटर टायसन मार्गदर्शन करताना*




*डॉ. लान्स कोप सी.एम.इ. मध्ये डॉक्टर्सना मार्गदर्शन करताना*




*शिबिरात ११० डोळ्यांच्या शस्त्रक्रीया करण्यात आल्या*



*शिबिरात २४ सांधे बदलण्याच्या शस्त्रक्रीया करण्यात आल्या*



*ब्रिटिश टीम सामुदायिक वाढदिवस समारंभात उत्साहाने सामील झाली*

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.

**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर